## अहवाल

## स्वातंत्र्यवीर सावरकर : आजच्या संदर्भात

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि सावरकर दर्शन प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२७




फेब्रुवारी २०१७ रोजी ''**स्वा.स्वातंत्र्यवीर सावरकर: आजच्या संदर्भात**'' या विषयावर या एक व्याख्यान योजण्यात आले होते. **स्वा. सावरकर यांच्या ५१ व्या पुण्यतिथी** निमित्त योजण्यात आलेल्या व्याख्यानाचे वक्ते होते **राष्ट्रवाद आणि सावरकरांचे विचारांचे अभ्यासक डॉ.अशोक मोडक**.

आज भारतात व भारताबाबत घडणाऱ्या राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय स्तरावरील घटना या सावरकर विचारांना कशा पूरक आहेत याचे सोदाहरण त्यांनी विवेचन केले. सावरकरांची परराष्ट्र धोरणा, संरक्षणाबाबतची दृष्टी, मराठीच्या संवर्धनासाठी केलेले कार्य, सामाजिक समरसतेचे त्यांचे अध्ययन व प्रत्यक्ष कृती या सर्वांचा आजच्या काळाशी धागा जुळवत सुमारे ७५ मिनिटे उपस्थित सुमारे ७० जणांना त्यांनी मंत्रमुग्ध केले.



कार्यक्रमाला प्रबोधिनीचे पदाधिकरी रवींद्र साठे व सावरकर दर्शन प्रतिष्ठानच्या उपाध्यक्षा ॲड.चित्रा फडके उपस्थित होते.